ePaper
# भाकरी फिरविण्याची वेळ, नवीन नेतृत्व तयार करणार!: पवार

वर्ष - 7 । अंक - 1 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- सुट्टी'वर गेलेले 400 कैदी अद्याप फरारच
- राज ठाकरेंची चौफेर टोलेबाजी
- राहुल गांधींना दिलासा नाहीच!

www.mahaenews.com | गुरुवार , दि. 27 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# चिंचवडच्या प्रलंबित प्रश्नांना 'गती'!

## » आमदार जगताप यांचा पुढाकार : आयुक्त शेखर सिंह यांना विविध सूचना

।पिंपरी महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड मतदार संघातील विविध नागरी समस्या सोडवाव्यात. तसेच रखडलेले प्रलंबित प्रकल्पांची कामे मार्गी लागतील अशी सूचना आमदार अश्विनी जगताप यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना केली. सर्व माजी नगरसेवकांसह पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या समवेत आमदार अश्विनी जगताप यांनी आज (दि.२६) आढावा बैठक घेतली.**



या बैठकीस चिंचवड मतदारसंघ निवडणूक प्रभारी माजी नगरसेवक शंकर जगताप, माजी सभागृह नेते नामदेव ढाके, शत्रुघ्न काटे, राजेंद्र गावडे, अंबरनाथ कांबळे, सुरेश भोईर, शशिकांत कदम, सागर अंगोळकर, अभिषेक बारणे, बाळासाहेब ओव्हाळ, संदीप कस्पटे, बाबा त्रिभुवन, हर्षल ढोरे, शेखर ओव्हाळ, संतोष कांबळे, मोरेश्वर शेडगे, राजेंद्र राजापुरे, स्थायी समिती माजी अध्यक्षा ममता विनायक गायकवाड, माजी नगरसेविका संगीता भोंडवे, उषा मुंढे, सविता खुळे, सुनिता तापकीर, मनीषा पवार, नीता पाडाळे, शारदा सोनवणे, निर्मला कुटे, अश्विनी चिंचवडे, आरती चोंधे व महापालिका अतिरिक्त आयुक्त, शहर अभियंता व खाते प्रमुख उपस्थित होते.

यावेळी चिंचवड मतदार संघातील विविध नागरी समस्या सोडवाव्यात. तसेच रखडलेले प्रलंबित प्रकल्पांची कामे मार्गी लागतील अशी सूचना आमदार अश्विनी जगताप यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना केली.

### आयुक्तांनी दिले आश्वासन...

» सदर बैठकीत माजी नगरसेवक, नगरसेविका यांच्या प्रभागातील रखडलेली विकास कामे व अडीअडचणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व लेखी स्वरूपात निवेदन देण्यात आले. यावर आयुक्तांनी लवकरच सर्व प्रलंबित कामे मार्गी लागतील असे आश्वासन दिले.

# शहरातील उद्यानांमधील सोयी सुविधांवर महापालिका देणार भर

## » आयुक्त शेखर सिंह यांचे आश्वासन, दुर्गा टेकडी उद्यानाला भेट

। पिंपरी । । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उद्यानांचे शहर म्हणून पिंपरी चिंचवडची ओळख निर्माण करण्यावर महापालिका भर देत आहे. सकाळी मॉर्निंग वॉक आणि स्वच्छ हवा मिळावी, यासाठी शहरातील उद्यानांमध्ये येणा-या नागरिकांसाठी महापालिकेमार्फत नागरी सोयीसुविधा उभारून चांगली सेवा देण्यात येईल, असे आयुक्त शेखर सिंह यांनी नागरिकांना आश्वासित केले.**

महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दुर्गादेवी टेकडी उद्यान येथे आज सकाळी अचानक भेट दिली. त्याभेटी दरम्यान दुर्गादेवी टेकडी येथे मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या नागरिकांबरोबर शहरातील पर्यावरण, नागरी सुविधा अशा विविध विषयांवर संवाद साधला.

नागरिकांनी देखील आयुक्तांसमोर विविध समस्या मांडून त्यावर चर्चा केली. महापलिका प्रशासन आणि नागरीक यांच्यातील संवाद दृढ व्हावा तसेच प्रशासनामध्ये नागरिकांचा सहभाग वाढावा, यासाठी ही भेट देण्यात आली. यावेळी उद्यान विभागप्रमुख रविकिरण घोडके यांच्यासह उद्यान विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



यावेळी दुर्गादेवी टेकडी येथे येणाऱ्या नागरिकांनी विविध विषयांवर आपली मते व्यक्त केली. त्यामध्ये दुर्गादेवी उद्यानाची सद्यस्थिती, पाणीपुरवठा, रंगरंगोटी, ओपन जिम इत्यादी बाबींसंदर्भात सूचना करण्यात आल्या. शहरातील पार्किंग व्यवस्था, पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्था, सौरऊर्जा, शहर स्वच्छता व नागरिक सहभाग अशा विविध विषयांवरही चर्चा करण्यात आली. तसेच, प्रत्यक्ष पाहणी करून अधिका-यांना सूचना केल्या.

### नागरिकांनी व्यक्त केले समाधान...

» प्रत्येक महिन्याच्या १० तारखेला मॉर्निंग वॉक ग्रुपच्या वतीने स्वच्छता मोहीम राबविण्यात येते. नागरिकांनी आयुक्तांना या स्वच्छता मोहिमेमध्ये सहभागी होण्यासाठी निमंत्रित केले. त्याला सकारात्मक प्रतिसाद देऊन या मोहिमेमध्ये सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर आयुक्तांनी दुर्गादेवी मंदिराला भेट देऊन दर्शन घेतले. महानगरपालिका आयुक्तांना भेटण्याची संधी मिळून त्यांच्यापुढे विविध प्रश्न मांडता आल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. भविष्यात देखील महापालिकेच्या प्रकल्पांना अशाच प्रकारे भेटी देण्यात येणार असल्याचे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

# 'सुट्टी'वर गेलेले 400 कैदी अद्याप फरारच!

## करोनाकाळात पॅरोलवर गेले ते परतलेच नाही, स्थानिक पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल

।पुणे।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**राज्यातील कारागृहांमध्ये शिक्षा भोगणाऱ्या चार हजार कैद्यांना करोनाकाळात आपत्कालीन अभिवचन रजेवर अर्थात 'पॅरोल'वर सोडण्यात आले होते. संसर्ग कमी झाल्यानंतर त्यांना कारागृहात परतण्याचा आदेशही देण्यात आला होता. मात्र, ४०६ कैदी अद्याप परत आले नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे फरारी कैद्यांच्या विरोधात स्थानिक पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यास सुरुवात झाली आहे.**




राज्यात मध्यवर्ती, जिल्हा, खुले आणि महिला अशी एकूण ६० कारागृहे आहेत. या कारागृहांची क्षमता २५ हजार ३९३ कैद्यांची आहे. प्रत्यक्षात मात्र, या कारागृहांमध्ये ४० हजार ९०५ कैदी ठेवण्यात आले आहेत. करोनाकाळातही कारागृहे 'ओव्हरफ्लो' झाली होती. कारागृहात संसर्ग वाढू नये, म्हणून शिक्षा भोगणाऱ्या कैद्यांना आपत्कालीन पॅरोलवर सोडण्याच्या सूचना कारागृह प्रशासनाला देण्यात आल्या होत्या. त्यानुसार कारागृह प्रशासनाने राज्यातील विविध कारागृहांतील चार हजार २०० पेक्षा जास्त कैद्यांना आपत्कालीन पॅरोलवर सोडले. त्यामध्ये जन्मठेपेबरोबरच सात वर्षांपर्यंत शिक्षा असलेल्या कैद्यांचा समावेश होता.

**साडेतीनशे फरारी कैद्यांवर गुन्हे**

आपत्कालीन पॅरोलवर सोडलेल्या कैद्यांना गृह विभागाने मे २०२२पर्यंत कारागृहांत हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. परत न आलेल्या कैद्यांवर स्थानिक पोलिस ठाण्यांत कारागृह प्रशासनाने गुन्हे दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. या कैद्यांवर 'भारतीय दंड संहिते'च्या 'कलम २२४'नुसार गुन्हे दाखल केले जात आहेत. आतापर्यंत साडेतीनशे फरारी कैद्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अन्य कैद्यांवर गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे, अशी माहिती कारागृह प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

> "कारागृह विभागाकडून फरारी कैद्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्याचे काम सुरू आहे. संबंधितांना अटक करण्याच्या सूचना पोलिसांना करण्यात आल्या आहेत. त्याबाबतचा आढावा दर आठवड्याला घेतला जातो. त्यामुळे कैदी परतण्याचे प्रमाण वाढले आहे. फरारी कैद्यांना पकडल्यानंतर त्यांना कारागृहांत सुविधा मिळणार नाहीत.
> - अमिताभ गुप्ता, राज्य कारागृह प्रमुख

### जन्मठेपेचे कैदी अजून बाहेरच

» करोनाचा संसर्ग कमी झाल्यानंतर राज्याच्या गृह विभागाने आदेश काढून मे २०२२मध्ये आपत्कालीन पॅरोलवर सोडण्यात आलेल्या कैद्यांना पुन्हा त्यांच्या कारागृह हजर राहण्याचे आदेश दिले होते. आदेशानंतर बरेच कैदी हजर झाले. मात्र, अद्याप ४०६ कैदी परत आले नसल्याचे दिसून आले आहे. त्यामध्ये सर्वाधिक कैदी मध्यवर्ती कारागृहातून सोडण्यात आलेले आहेत. फरारी झालेल्या कैद्यांमध्ये जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्यांचा समावेश आहे.

**येरवडा कारागृहातील १८ कैदी**

येरवडा मध्यवर्ती कारागृहातून करोना आपत्कालीन रजेवर सोडलेले १८ कैदी अद्याप फरारच आहेत. त्याबरोबरच येरवडा महिला कारागृहातील दोन आणि येरवडा खुल्या कारागृहातील पाच जण फरारी आहेत. याशिवाय तळोजा (५०), नाशिक रोड (४४), नागपूर (२३), पैठण खुले कारागृह (२२), अमरावती (३३) कोल्हापूर (२४) आणि छत्रपती संभाजीनगर (२२) या कारागृहांतील कैदी फरारी झाले आहेत.

**पूर्वीचे सहाशे कैदी फरार**

राज्यातील विविध कारागृहांतून यापूर्वीच 'पॅरोल' आणि 'फर्लो'ची सुट्टी मिळालेले सहाशेपेक्षा अधिक कैदी फरारी आहेत. त्यामध्ये १९८० पासूनच्या कैद्यांचा समावेश आहे. फरारी झालेले बहुतांश कैदी जन्मठेपेची शिक्षा भोगणारे आहेत. या सहाशे कैद्यांना पकडण्यात अद्याप यश आलेले नाही. त्यातच आता करोनाकाळातील चारशे कैदी फरारी असल्याने यंत्रणेसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे.

---

# चंद्रकांत पाटील पुण्याचे पाहुणे, ते लाटेतील आमदार!

## कोल्हापूरला पाठवायचं ठरलंय, आमदार रवींद्र धंगेकरांचा चंद्रकांत पाटलांवर हल्लाबोल

।पुणे।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

कसबा विधानसभा पोटनिवडणुकीपासून सुरु झालेलं चंद्रकांत पाटील आणि रवींद्र धंगेकर यांच्यातील आरोप प्रत्यारोपाचं सत्र कायम आहे. कसबा पोटनिवडणुकीच्या प्रचारावेळी चंद्रकांत पाटील यांनी हू इज धंगेकर असं म्हटलं होतं. त्यानंतर रवींद्र धंगेकर यांनी निवडणुकीत विजय मिळवून दाखवत मी रवींद्र धंगेकर असं प्रत्युत्तर दिलं होतं. आता रवींद्र धंगेकरांनी पुण्याचे पालकमंत्री तथा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटलांवर यांच्यावर हल्लाबोल केला आहे. चंद्रकांतदादा मुळचे पुणेकर नाहीत. ते पाहुणे म्हणून आले आहेत, आणि विधासभा निवडणुकीच्या लाटेतले ते आमदार आहेत. चंद्रकांत पाटलांनी कुठे ही बोट ठेवावं, महाराष्ट्रात कुठेही त्यांच्या विरोधात लढायला तयार आहे, असं ओपन चॅलेंजच कॉंग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी दिले आहे.



वेताळ टेकडीच्या विकास संदर्भात चंद्रकांत पाटील आग्रही आहेत. मात्र, वेताळ टेकडीचा विकास करून ती तोडू नये असा स्थानिकांची आणि स्वतः भाजपच्या माजी आमदार मेधा कुलकर्णींची मागणी आहे. मात्र, चंद्रकांत पाटील यांनी वेताळ टेकडीचा विकास रेटून धरला आहे. या प्रश्नाकडे लक्ष करत रवींद्र धंगेकर यांनी पाटलांना धारेवर धरलं आहे.

### पाहुणा जास्त दिवस घरात ठेवायचा नसतो...

»माझ्या पक्षाने जर आदेश दिला आणि महाविकास आघाडीने ठरवलं तर चंद्रकांत पाटलांनी राज्यात कुठे ही बोट ठेवावं तिथे मी त्यांच्यासोबत लढायला तयार आहे. कारण ते आपले पुणेकर नाहीत ते मुळचे कोल्हापूरचे आहेत. ते पार्सल कोल्हापूरला पाठवण्याची तयारी भारतीय जनता पार्टी आणि आम्ही केली आहे. कारण पाहुणा जास्त दिवस घरात ठेवायचा नसतो, असं थेट ओपन चॅलेंज धंगेकर यांनी दिलं आहे.

यावेळी धंगेकर म्हणाले की, निसर्गाने जे दिलं आहे ते ठेवून विकास करायला काही हरकत नाही. टेकडी फोडून जर पुणेकरांचा निसर्ग खराब करणार असाल तर त्याला पर्यायी व्यवस्था आहे. चंद्रकांतदादा मुळचे पुण्याचे नाहीत? ते पाहुणे म्हणून आले आहेत. मागच्या विधानसभा लाटेतील ते आमदार आहेत, असं धंगेकर म्हणाले.

# विरोधी पक्षनेते अजित पवार भाजपासोबत गेल्यास

# पिंपरी-चिंचवड 'राष्ट्रवादीमुक्त'?

## » लांडगे, बारणे 'विरोधक मुक्त' : राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांना 'भगवा' खांद्यावर घ्यावा लागणार!

।पुणे।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**विरोधी पक्षनेते अजित पवार भाजपात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा मागील काही दिवसांपासून रंगल्या होत्या. यावर अजित पवारांनी या चर्चा फेटाळून लावत राष्ट्रवादीतच राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. अशातच, राष्ट्रवादीचे खासदार अमोल कोल्हे अमोल कोल्हे यांनी एक फोटो सोशल मीडियावर पोस्ट शेअर केला आहे. यावरुनच कोल्हे भाजपाच्या वाटेवर असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे.**




राज्यातील राजकीय घडमोडी प्रचंड वेगात सुरू आहेत. विरोधी पक्षनेते अजित पवार भाजपासोबत जाणार, अशी चर्चा जोर धरु लागली आहे. राष्ट्रवादीचे सर्वोच्च नेते शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह अजित पवार यांची गेल्या काही दिवसांतील भाजपाविरोधातील मवाळ भूमिका बोलकी आहे. त्यामुळे उद्या अजित पवार भाजपासोबत गेल्यास पिंपरी-चिंचवडमध्ये राजकीय स्थिती कशी असेल? याबाबत प्रश्न उपस्थित केला जात आहे.

२०१४ मध्ये राष्ट्रवादीतील धुरंधर नेते स्व. लक्ष्मण जगताप यांच्यासह अनेकांचा भाजपात प्रवेश करुन घेतला. २०१७ च्या महापालिका निवडणुकीपूर्वी महेश लांडगे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीतील नगरसेवकांचा मोठा गट भाजपात दाखल झाला. महापालिकेतील सत्ता राष्ट्रवादीला गमवावी लागली. आता अजित पवार यांनी भाजपासोबत जाण्याचा निर्णय घेतल्यास उरले-सुरले नेते भाजपात दाखल होतील आणि पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादीमुक्त होईल, असा दावा राजकीय जाणकारांकडून केला जात आहे.

चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांना साथ दिली. भाजपासोबत न जाण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय वंचितच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांना आवडला नाही. त्यामुळे त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत प्रवेश केला होता. आता अजित पवार यांच्या भाजपा प्रवेशामुळे राष्ट्रवादीतील नाराज झालेला आणि भाजपाविरोधी गटाला पुन्हा नवा राजकीय आश्रय शोधावा लागेल, असाही दावा केला जातो.

प्रभाग, बूथ स्तरावर काम करुन भाजपाचा प्रचंड विरोध करणारे निष्ठावंत कार्यकर्त्यांना उद्या भाजपाच्या पदाधिकाऱ्यांसोबत जुळवून घ्यावे लागेल. आजच्या घडीला राज्यात ज्याप्रमाणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असले, तरी 'कंट्रोल' उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दिसतो. त्याचप्रमाणे उद्या अजित पवार मुख्यमंत्री झाले किंवा राष्ट्रवादी आणि भाजपाची युती झाली, तरी 'रिमोट कंट्रोल' भाजपाकडेच राहणार आहे. त्याचीच प्रचिती स्थानिक पातळीवर येईल आणि भाजपाच्या नेत्यांचा वरचष्मा राहणार आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांना भाजपासोबत जुळवून घेणे किंवा राजकीय दिशा बदलणे हे दोनच पर्याय राहणार आहेत. पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादीचे सर्व धुरा केवळ अजित पवार यांच्यावर अवलंबून आहे. येथील पदाधिकारी आणि नेत्यांना पुरोगामी किंवा प्रतिमागी अशा विचारधारांबाबत काहीही देणे-घेणे नाही. "अजित पवार बोले आणि पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी चाले.." अशी स्थिती आहे. पक्षाच्या संघटनात्मक कार्यक्रमाला होणारी गर्दी आणि अजित पवार यांच्या कार्यक्रमाला होणारी गर्दी यातील फरक पाहिला, तर ही बाब प्रकर्षाने लक्षात येते. त्यामुळे अजित पवार अस्थिर झाले, तर पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादीच्या गडाला भेगा पडतात. संभाव्य प्रवेश झालाच तर विधानसभा नव्हे, तर महापालिकेतील राष्ट्रवादीचे संख्याबळसुद्धा घटेल, ही वस्तुस्थिती आहे.

### आमदार बनसोडेंच्या रुपाने पिंपरीत 'कमळ' फुलणार!

» पिंपरी विधानसभा मतदार संघाचा विचार करता मतदार संघाच्या निर्मितीपासून या मतदार संघात भाजपाला यश मिळालेले नाही. विद्यमान आमदार अण्णा बनसोडे यांच्या रुपाने मतदार संघात राष्ट्रवादीचे वर्चस्व आहे. तर दुसरीकडे, शिवसेनेची ताकद तुल्यबळ आहे. उद्या कदाचित अजित पवार यांच्यासोबत अण्णा बनसोडे भाजपावासी झाले, तर राष्ट्रवादीला हा मतदार संघ मगवावा लागेल. चिंचवड, भोसरीसह पिंपरीतसुद्धा भाजपाचे 'कमळ' फुलेल. कारण, भाजपाला कोणत्याही प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व संपुष्टात आणायचे आहे. यासह पिंपरीत भाजपाकडे बनसोडेंसारखा प्रभावी चेहरा नाही. याउलट, भाजपातील काही नाराज बनसोडे भाजपासोबत जातील आणि आपल्याला राष्ट्रवादीकडून उमेदवारी मिळेल. त्याद्वारे विधानसभा सदस्य बनण्याचे स्वप्न पूर्ण होईल, अशा प्रतिक्षेत आहेत. त्यासाठी अजित पवार यांच्याकडे 'पिंगा' घालत आहेत. त्यांचा पुरता भ्रमनिरास होईल, असे निरीक्षण राजकीय जाणकार नोंदवतात.

### भ्रष्टाचार हा निवडणुकीचा मुद्दा राहणार नाही...

» पिंपरी-चिंचवड महापालिकेत २०१७ मध्ये भाजपाची सत्ता आली. तत्पूर्वी, १५ वर्षे राष्ट्रवादीची महापालिकेत एकहाती सत्ता होती. राष्ट्रवादीच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी आणि काही भाजपाविरोधकांनी भ्रष्टाचार हा निवडणुकीचा मुद्दा केला. भाजपा काळात मोठा भ्रष्टाचार आणि त्याची यादीच लोकांसमोर ठेवली. आगामी महापालिका, विधानसभा आणि लोकसभा निवडणूक भ्रष्टाचाराच्या मुद्यावर लढवली जाईल, अशी स्थिती होती. मात्र, अजित पवार यांच्या भाजपाच्या कथित प्रवेशाबाबत चर्चा सुरू झाल्या आणि भ्रष्टाचाराचा मुद्दा मागे पडला.आता राष्ट्रवादीच्या नेत्यांनी भ्रष्टाचाराच्या मुद्यावर उर बडवून काहीही हाताला लागणार नाही. स्मार्ट सिटी योजनेपासून भामा आसखेडमधील जॅकवेलच्या निविदेपर्यंत भ्रष्टाचाराचे अनेक आरोप राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी केले. उद्या अजित पवार भाजपासोबत गेले, तर सर्व आरोप आणि पत्रके बासनात गुंडाळून ठेवावी लागणार आहेत.

### लांडगे, बारणे विरोधक मुक्त...

» राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या स्थानिक नेत्यांना भाजपाचे आमदार महेश लांडगे आणि शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्यासोबत दोन हात करावे लागत होते. अजित पवारांच्या संभाव्य भाजपा प्रवेशामुळे राष्ट्रवादीतील स्थानिक नेते एकतर भाजपात प्रवेश करतील किंवा राजकीय आत्मसमर्पण करतील. चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत राष्ट्रवादीचे आमदार अण्णा बनसोडे यांनी जाहीरपणे भाजपाला साजेशी भूमिका घेतली किंवा स्व. लक्ष्मण जगताप यांच्या मैत्रीबाबत सहवेदना दाखवली. तशीच आत्मियता राष्ट्रवादीचे नेते विलास लांडे यांनीही दाखवली. मध्यंतरी, लांडे यांच्या शिक्षण संस्थेला मदत केल्याबद्दल त्यांनी जाहीरपणे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे आभार मानले होते.

### भाजपातील घरभेद्यांची राजकीय कोंडी

» महाविकास आघाडीची सत्ता २०१९ मध्ये राज्यात स्थापन झाली. त्यानंतर अडीच वर्षांच्या काळात पिंपरी-चिंचवड भाजपामधील नाराज नगरसेवकांनी उसळी घेतली. भाजपाविरोधात थेट भूमिका घेत यकाहींनी अजित पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला. तर काहीजणांनी भाजपाच्या स्थानिक नेत्यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लक्ष्य करण्यास सुरूवात केली. तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि विद्यमान विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या भरोश्याने भाजपाविरोधात मैदानात उरलेल्या आणि भाजपामध्येच कुरघोडीचे राजकारण करणाऱ्या अतृप्त आत्म्यांची आता राजकीय कोंडी झाली आहे. अजित पवार भाजपात जातील, अशी शक्यता असल्याने स्थानिक पातळीवर आपली अडचण होणार आणि राजकीय भविष्य संघर्षमय होणार, अशी धास्ती अनेकांनी घेतली आहे. राज्यात राजकीय उलथापालथ झाली, तरी प्रभागात स्थानिक नेत्यांचीच मदत घ्यावी लागते. त्यामुळे काही भाजपाविरोधकांची झोप उडाली आहे, असा दावा भाजपासह राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांकडून केला जातो.

## संपादकीय »

# न्याय नावाचा अन्याय

***बिल्किस बानो खटल्याबाबत महत्वाची अपडेट आली आहे. याबाबत सर्वोच्च न्यायालयाने काय मत मांडलं अन् अशा घटनांत काय निर्णय अपेक्षित आहे? जाणून घेऊयात...***

गुजरातमध्ये गोध्रा स्थानकात कारसेवकांना घेऊन जाणाऱ्या रेल्वेगाडीचे डबे जाळले गेल्यानंतर हिंदू-मुस्लिम दंगलींचा स्फोट झाला होता. या दंगलींना आता दोन दशके उलटून गेली आहेत. मात्र, या भयानक नरसंहार आणि अत्याचार झालेल्या दंगलींमधील काही गुन्हे व खटले जनमानसात रुतून बसले आहेत. त्यातील एक ‘बिल्किस बानो खटला’ नावाने ओळखले जाणारे एक प्रकरण आहे.

या प्रकरणात पाच महिन्यांची गरोदर असणाऱ्या बिल्किसवर अत्याचार झाले. तेव्हा ती २१ वर्षांची होती. याशिवाय तिच्या घरातील, नात्यातील सात जणांची हत्या झाली. यात काही लहान मुलेही होती. या गुन्ह्याचा खटला चालून, अखेर ११ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा झाली. हे सारेच आरोपी या पीडित कुटुंबाच्या परिचयातले आणि नेहमीच्या जाण्यायेण्यातले होते, असेही तपासात उघड झाले होते. या सर्व आरोपींची १५ ऑगस्ट २०२२ रोजी, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या मुहूर्तावर मुक्तता करण्यात आली. थोडक्यात, त्यांची उर्वरित शिक्षा माफ करण्यात आली. हे गुन्हेगार तुरुंगाच्या बाहेर आले, तेव्हा त्यांचे कसे हारतुऱ्यांनी स्वागत झाले, बँडबाजे लावण्यात आले आणि प्रक्षोभक घोषणा दिल्या गेल्या, याचे वृत्तान्त तेव्हा प्रकाशित झाले होते. या साऱ्या सोहळ्यावर आणि गुन्हेगारांच्या मुक्ततेवर तेव्हाही ‘महाराष्ट्र टाइम्स’ने कठोर शब्दांत टीका केली होती. आज सर्वोच्च न्यायालयाने या गुन्हेगारांना मुक्त करण्याच्या केंद्र व गुजरात सरकारच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ते योग्य आहे. तसे ते केले नसते, तर देशातील कायद्याच्या राज्याचा पायाच भुसभुशीत होत असल्याचा संदेश गेला असता.


‘जन्मठेप याचा अर्थच आजन्म कारावास’ असे स्पष्टीकरण सर्वोच्च न्यायालयाने आजवर अनेकदा दिले आहे, तरीही जन्मठेपेचे अनेक कैदी काही वर्षांची शिक्षा भोगून बाहेर येतात. या प्रकरणातील अनेक गुन्हेगार आधीच किती तरी दिवस ‘पॅरोल’वर बाहेर राहत होते. आता तर ते शिक्षा भोगून झाल्यामुळे मुक्त झाले आहेत.

# आदर्श जगातील कोलाहलाचा शोध




**आपल्या भवतालचे जग दिवसेंदिवस जटिल होत आहे. विशेषत: गेल्या दशकात जगभरात घडलेल्या घटना, राजकीय-सामाजिक व सांस्कृतिक उलथापालथी आणि तंत्रज्ञानात झालेले क्रांतिकारी बदल या सगळ्यांचा आपल्या रोजच्या जगण्यावर निश्चितच परिणाम झाला आहे.**

हा परिणाम दर वेळी आपल्याला दिसेल अथवा जाणवेलच असे नाही. परंतु आपल्या अस्तित्वावर, विचारांवर आणि नातेसंबंधांवर या सर्व घडामोडींचा तात्कालिक आणि दूरगामी परिणाम होत असतो. कदाचित प्रत्येक पिढीतील वडीलधारे भूतकाळाच्या आठवणी जागवत भविष्याची चिंता व्यक्त करत असतात. प्रत्येक पिढीचे वेगळे ताण असतात, समस्या असतात. त्या समस्यांचे निराकरण करण्याचे स्वत:चे काही मार्ग असतात. त्यातून पुढच्या पिढीला, आपल्या मुलांना काहीएक मार्गदर्शन करता येईल इतके संचित जमा होते. पण आजचे जग काहीसे निराळे आहे. आज तरुण पिढीला पडणारे प्रश्न वेगळ्याच प्रतलावरचे वाटू शकतात. ते वापरत असलेले तंत्रज्ञान, समाजमाध्यमे, संवादाची इतर साधने, आंतरजालाच्या मदतीने ज्ञानाचे सहज उपलब्ध झालेले प्रचंड भांडार आणि त्याच वेळी माहितीच्या विस्फोटामुळे उद्भवलेली गोंधळाची स्थिती, विचारसरणींची घुसळण व मतमतांतराचा गदारोळ या सगळ्याचा समतोल कसा साधायचा असा प्रश्न सर्वांनाच पडलेला दिसतो. मागच्या पिढीकडून पुढच्या पिढीकडे




आपोआप संक्रमित होणारी मूल्ये व मार्गदर्शक तत्त्वे आता, या काळात पुरेशी ठरतीलच, असे ठामपणे म्हणता येत नाही. प्रश्नांची उत्तरे शोधता शोधता नवीनच समस्या उद्भवण्याची शक्यता अधिक. या कोलाहलावर बेतलेली कादंबरी म्हणजे कुणाल बासू यांची ‘इन अॅन आयडियल वर्ल्ड’.

ही कहाणी आहे कोलकात्यातील सुखवस्तू, उच्चमध्यमवर्गीय आणि तथाकथित उच्चजातीय सेनगुप्ता कुटुंबाची. आई रोहिणी, वडील जॉय आणि शिक्षणानिमित्त दूरच्या शहरात राहणारा त्यांचा विशीतला मुलगा बॉबी असे हे छोटेखानी कुटुंब. जॉय बँकर तर रोहिणी शाळेतील शिक्षिका. या दोघांचा प्रेमविवाह झालेला असतो, ज्यात मार्क्सवादी- माओवादी विचारसरणीचा मोठा वाटा असतो. त्या दोघांनी महाविद्यालयात शिकत असताना चळवळीला वाहून घेतलेले असते, विशेषत: जॉय हा त्याच्या तरुण वयात आघाडीचा क्रांतिकारक म्हणून ओळखला जात असतो. पण सद्य:स्थितीत मात्र ते अतिशय सुखासीन, अभिरुचीपूर्ण, कदाचित चंगळवादी म्हणू शकतो असे आयुष्य जगत असतात. त्यांच्या या चाकोरीबद्ध आयुष्यात फारसा बदल घडत नसतो आणि त्यामुळे एक प्रकारची सुस्ती आलेली असते. त्यांना भवतालचे आकलन जरूर असते, पण त्याचा त्यांच्या आयुष्यावर थेट परिणाम होत नसल्याने बाहेरचे जग आणि त्यांचे आयुष्य यात अंतर पडलेले असते. मात्र एका घटनेमुळे जॉय आणि रोहिणीच्या पायाखालची जमीन सरकते.

त्यांचा मुलगा बॉबी हा मनहर या कोलकात्यापासून दूर असणाऱ्या एका लहान शहरातील नवीन खासगी विद्यापीठात शिकायला असतो. त्याच विद्यापीठात जॉयची कॉलेजमधील एक मैत्रीण काम करत असते. एक दिवस ती तडकाफडकी जॉयला भेटायला कोलकात्याला येते आणि त्याला विद्यापीठातील एका घटनेची माहिती देते. अल्ताफ नावाचा एक मुस्लीम विद्यार्थी तीन महिन्यांपासून विद्यापीठातून गायब झालेला असतो. त्याचा ठावठिकाणा शोधण्यात पोलीस अपयशी ठरतात. अल्ताफची आई आणि इतर काही मित्रमैत्रिणी त्याला शोधण्याचे बरेच प्रयत्न करत असतात.

**परिणामकारक संवादकौशल्य सवयीने दिवसेंदिवस विकसित होऊ लागते. ज्याचे वैयक्तिक; तसेच व्यक्तिपत्वे फायदे गेल्या तीन-चार लेखांत आपण पाहिले. आता याच संवादकौशल्याचा फायदा एखाद्या व्यवसायाला अथवा संस्थेच्या विकासाला कसा होत जातो ते पाहू या.**

# व्यावसायिक संवादकौशल्य



१. संस्थेतील अंतर्गत संवाद

यामध्ये रोजच्या विभागीय मीटिंग, नोटिसा, ई-मेल; तसेच विविध चर्चांचा समावेश होतो. तसेच व्यवस्थापक व कर्मचारी यांच्यातील संवाद. हे सर्व संवाद सुस्पष्ट, जाणीवपूर्वक; तसेच जबाबदारीने करणे आवश्यक असते. यामुळे संस्थेच्या विकासासाठी पोषक; तसेच आश्वासक वातावरण तयार होते. प्रत्येक कर्मचाऱ्याला स्वतःची संस्थेतील भूमिका नीट समजण्यास मदत होते.

२. बहिर्गत संवाद

हा संवाद गुंतवणूकदार, ग्राहक, उत्पादक; तसेच जाहिरातदार यांच्यामध्ये घडत असतो. या सर्वांना आपल्या संस्थेचे VISIOM, MISSION आणि VALUES सांगून संस्थेची विश्वासार्हता सांभाळत, संस्थेला नावारूपाला आणणे यासाठी केला जातो.

३. आव्हाने आणि अडथळे आजच्या अतिशय वेगवान व्यावसायिक जगतात सतत काही ना काही आव्हानांना तोंड द्यावे लागते. जसे की, उत्पादन क्षेत्र, आर्थिक आवक-जावक; तसेच प्रत्येक क्षेत्रातील जनसंपर्क करताना होणारे समज-गैरसमज हे सर्व उत्तम संवादकौशल्यानेच हाताळता येते.

४. नेतृत्व आणि व्यवस्थापन

जेव्हा एखादे काम करण्याची वेळ येते, तेव्हा संवाद हे कोणत्याही नेत्याकडे असलेले सर्वांत महत्त्वाचे कौशल्य आहे. परिणामकारक संवाद केल्याने तुमच्यातील नेतृत्वगुण वाढीस लागतो. छोट्या-मोठ्या समूहांना सांभाळा. त्यांना संस्थेच्या कामाची माहिती, त्यांच्या पातळीवर जाऊन, त्यांना समजेल अशा भाषेत सांगणे हे अतिशय महत्त्वाचे ठरते. यातूनच तुमच्यात एक उत्तम श्रोता तयार होतो.

समोरच्याची बाजू नीट समजून घेऊन, त्याला जमेल, झेपेल असे काम सोपवणे आणि ते उत्तम प्रकारे, सतत मागोवा घेऊन पूर्ण करून घेणे ही जबाबदारीही नेतृत्वाचीच असते. आपण ऐकतो, तेव्हा आपण अधिक सामर्थ्यवान होत जातो. प्रतिनिधीत्व अधिकाधिक प्रभावी होत जाते.

५. मिश्र संस्कृतीशी संवाद )

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात वैविध्यपूर्ण संस्कृतीशी संवाद करण्याची क्षमता आपल्याला वाढवायला हवी. कारण आपले गुंतवणूकदार; तसेच ग्राहक हे जगभर आहेत, अशा या जागतिक संवादकौशल्यात अनेक वेगवेगळी आव्हाने आपल्यासमोर येतील. अनेक प्रगत देशांशी संवाद साधावा लागणार आहे. उदाहरणार्थ, जपान. सुरुवात जपानी भाषा शिकण्यापासून होईल; तसेच तेथील वागण्याच्या पद्धती, चालीरीती समजून घ्याव्या लागतील. भौगोलिक व सामाजिक परिस्थितीचा सखोल अभ्यास करून परिणामकारक

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राज ठाकरेंची चौफेर टोलेबाजी!

## अमृता फडणवीसांच्या प्रश्नावर राज ठाकरेंचं सडेतोड उत्तर; देवेंद्र फडणवीसांना लगावला टोला

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची मागील काही दिवसांपासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर जवळीकता वाढली आहे. २०१९ च्या निवडणुकीत राज ठाकरे यांनी ‘लाव रे तो व्हिडीओ’च्या माध्यमातून भाजपावर हल्लाबोल केला होता. दरम्यान, ते शरद पवारांबरोबर जवळीक वाढवताना दिसले होते. आता याच राजकीय स्थितीवरून अमृता फडणवीस यांनी राज ठाकरेंना प्रश्न विचारला. यावर राज ठाकरेंनी सडेतोड उत्तर देत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनाच टोला लगावला आहे. खरं तर, ‘लोकमत’ने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात देवेंद्र फडणवीसांच्या पत्नी अमृता फडणवीस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार अमोल कोल्हे यांनी राज ठाकरेंची मुलाखत घेतली. या मुलाखतीतून राज ठाकरेंनी चौफेर टोलेबाजी केली.**



यावेळी अमृता फडणवीसांनी राज ठाकरेंनी विचारलं की, “कधी तुम्ही राष्ट्रवादीच्या जवळ दिसता… कधी बाळासाहेब ठाकरेंच्या शिवसेनेबरोबर दिसता… तर कधी भाजपाला टाळी देता… तुमचं ‘कभी हा कभी ना’ हे नाटक खूप पाहिलंय. पण आता ‘हम साथ साथ है’ हे कुणाबरोबर आणि कधी करणार?” यावर उत्तर देताना राज ठाकरेंनी थेट देवेंद्र फडणवीसांवर टोलेबाजी केली.

अमृता फडणवीसांच्या प्रश्नाला उत्तर देताना राज ठाकरे म्हणाले, “तुम्ही देवेंद्र फडणवीसांच्या पत्नी म्हणून मला हे विचारत नाहीत, त्यामुळे मी बोलूनच टाकतो. सध्या महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री (देवेंद्र फडणवीस) कुणाबरोबर आहेत? हेच कळत नाही. कारण ते पहाटे गाडी घेऊन कुठेतरी जातात… हे कित्येकदा तुम्हालाही माहीत नसतं, मग ते कधीतरी शिंदेंबरोबर असतात. तर कधी पहाटे अजित पवारांचा चेहरा उतरलेला दिसतो, अशा अनेक गोष्टी घडताना दिसतात. कुणाला तरी भेटणं, ही प्रसारमाध्यमांसाठी बातमी झालीये. राजकारणातील मोकळेपणा मीडियाने घालवला आहे. त्यामुळे या सगळ्या गोष्टींना काही अर्थ नाही. कुणी कुणाशी बोललं आणि कुणी कुणाला भेटलं तर लगेच युती किंवा आघाडी होत नसते. जोपर्यंत याला मोठं स्वरुप येत नाही. तोपर्यंत त्यावर बोलण्याला काही अर्थ नाही.”

अमृता फडणवीस राज ठाकरेंना प्रश्न विचारत म्हणाल्या, “प्रभावी विरोधकाला लोक घाबरतात. मात्र, प्रशासक लोकांना घाबरायला लागतो. राज ठाकरेंची आजही एकदम डॉनसारखी प्रतिमा आहे. म्हणजे चांगल्या डॉनची प्रतिमा आहे. उद्योग क्षेत्र, चित्रपटसृष्टी असो किंवा राजकारणी असो, आजही राज ठाकरेंना घाबरतात. ही प्रतिमा तुम्ही जाणूनबुजून तयार केली की तुमचं व्यक्तिमत्त्व, आंदोलनं, तुमच्यावरील दाखल गुन्हे यामुळे घाबरतात?”

### पण तसा मी ‘नो नॉनसेन्स’वाला माणूस”

» या प्रश्नावर राज ठाकरे म्हणाले, “प्रतिमा ही काही तयार केलेली गोष्ट नसते. तयार केलेली गोष्ट ही तात्पुरती असते. मुळात मी तसा असेन. डॉन नाही, पण तसा मी ‘नो नॉनसेन्स’वाला माणूस आहे. मी परखडपणे बोलत असेल, स्पष्टपणे बोलत असेन, पण उद्धटपणे बोलत नाही. मात्र, अनेकदा लोकांना स्पष्टपणा आणि उद्धटपणातील फरक कळत नाही. असं असलं तरी मी स्पष्टपणे बोलतो.”

### “मला राग फार पटकन येतो, पण तो राग”

»“मला राग फार पटकन येतो, पण तो राग तितक्याच पटकन मावळतोही. मला कित्येकदा आमच्या पक्षातील लोक म्हणतात की, जरा कमी स्पष्ट बोला,” असं राज ठाकरेंनी नमूद केलं.

---

# …तर किरीट सोमय्यांना कॉलर पकडून घेऊन येईन

## 500 कोटींच्या भ्रष्टाचार प्रकरणावरून राऊतांचा हल्लाबोल!

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी काही दिवसांपूर्वी भाजपा आमदार राहुल कूल यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. कूल यांनी भीमा पाटस सहकारी साखर कारखान्यात ५०० कोटींचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप त्यांनी केला. याबाबत संजय राऊतांनी आज दौंड तालुक्यातील वरवंड येथे ‘पोलखोल’ सभा घेतली आहे. या सभेतून संजय राउत यांनी राहुल कूल यांच्यासह भाजपा नेते किरीट सोमय्या यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला.



राहुल कूल यांनी भीमा सहकारी साखर कारखान्यात ५०० कोटींचा गैरव्यवहार केला, तरीही त्यांच्यावर सरकारकडून कोणतीच कारवाई केली जात नाही. या प्रकरणाची माहिती देण्यासाठी मी देवेंद्र फडणवीसांकडून दोन महिन्यांपासून वेळ मागतोय, पण ते वेळ देत नाही. मी येतो म्हटलं की ते पळून जातात, अशा शब्दांत संजय राऊतांनी टीकास्त्र सोडलं. विरोधी पक्षातील नेत्यांवर खोटे गुन्हे दाखल करून त्यांच्यावर कारवाई केली जाते, असा आरोपही राऊत यांनी केला.

वरवंड येथील ‘पोलखोल’ सभेत संजय राउत म्हणाले, “अनिल देशमुख, हसन मुश्रीफ, नवाब मलिक, संजय राऊत, अनिल परब आणि तिकडे दिल्लीत मनीष सिसोदिया हे सर्व नेते फक्त विरोधी पक्षाचे आहेत, म्हणून त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल केले जातात. आता शिवसेनेतून जे ४० आमदार तिकडे गेले आहेत. त्यातील १२ जण भ्रष्टाचाराने बरबटलेले आहेत. प्रत्येकावर ईडी आणि सीबीआयचा खटला दाखल आहे.”

### यांच्या भ्रष्टाचाराचं काय?

»“प्रताप सरनाईक, यशवंत जाधव, भावना गवळी यांच्यावर ईडी, सीबीआय आणि इन्कम टॅक्स विभागाकडून गुन्हे दाखल आहेत. या सगळ्यांना भाजपाने आपल्यात घेतलं, वॉशिंगमशीनमध्ये टाकलं, धुतलं आणि स्वच्छ केलं. आता त्यांच्या खटल्याचं काय झालं रे किरीट सोमय्या… आता काय झालं? पुढच्या वेळी इकडे येताना मी किरीट सोमय्यांना बरोबर आणणार आहे. तो नाही आला तर कॉलर पकडून घेऊन येईन… जरा यह भी भ्रष्टाचार देखो, ५०० करोड का… मिस्टर कूल आप मिस्टर कूल हो, तो मै भी मिस्टर हॉट हू… आपको छोडुंगा नही,” अशा शब्दांत संजय राऊतांनी टीकास्त्र सोडलं.

---

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सुट्टीवर की कामावर….

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

तीन दिवस रजेवर असल्याच्या मुद्द्यावरून खासदार संजय राउत यांच्यासह महाविकास आघाडीतील अनेक नेत्यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्यावर टीका केली होती. राज्यातील महत्त्वाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत मुख्यमंत्री रजेवर गेले असं ते म्हणाले होते.

दरम्यान, विरोधाकांच्या टीकेला आता मुख्यमंत्र्यांनी कामाद्वारे उत्तर देण्यात प्रयत्न केला आहे. सातारा दौऱ्यावर असतानाही त्यांनी तब्बल ६५ पेंडिंग फाईल्सचा निपटारा केल्याची माहिती मुख्यमंत्री कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

### सातारा दौऱ्यावर असतानाही 65 प्रलंबित फाईल्सचा निपटारा!



**दूरदृश्य प्रणालीद्वारे ६५ फाईल्सचा निपटारा**

मुख्यमंत्री सचिवालयात विविध विभागांच्या फाईल्स येत असतात. त्या प्रलंबित राहू नये म्हणून नियमित निपटारा करण्यात येतो.

# राहुल गांधींना दिलासा नाहीच!

## मानहानी प्रकरणात घेतली गुजरात हायकोर्टात धाव

**।नवी दिल्ली महाईन्यूज।**

**काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि माजी खासदार राहुल गांधी यांनी आता गुजरात हायकोर्टात धाव घेतली आहे. मानहानी प्रकरणात दोषित्व स्थगित करावं, अशी विनंती राहुल यांनी हायकोर्टाला केली आहे. सुरत सत्र न्यायालयाने दोषित्व स्थगित करण्यास नकार दिला होता. त्यामुळे राहुल यांची खासदारकी रद्दच राहिली आहे. सुरतच्या महान्यायदंडाधिकाऱ्यांच्या निर्णयाला स्थगिती देण्यास सेशन कोर्टाने नकार दिला. त्यामुळे राहुल गाधींना आता हायकोर्टाची पायरी चढावी लागली.**

राहुल गांधींना सुरत कोर्टाने 23 मार्च रोजी दोन वर्षांची शिक्षा सुनावली होती. त्यामुळे लोकप्रतिनिधी कायद्यातल्या तरतुदीनुसार पुढच्या चोवीस तासातच लोकसभा सचिवालयाने अपात्रतेची कारवाई केली होती.

19 एप्रिल 2019 रोजी एका प्रचारसभेमध्ये राहुल गांधीनी मोदी आडनावावरून वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. या संदर्भात मानहानीच्या खटल्यात दोन वर्षांच्या तुरुंगवासाच्या शिक्षेविरोधातील राहुल गांधींचा अर्ज सुरत कोर्टाने फेटाळला आहे. सुरत कोर्टाने दिलेल्या निर्णयाविरोधात राहुल गांधी आता हायकोर्टात दाद मागणार आहेत.



दोन वर्षांच्या शिक्षेला स्थगिती मिळाल्यास अपात्रतेची कारवाई रद्द होण्याची ही शक्यता आहे. त्यामुळे राहुल गांधींनी हायकोर्टात धाव घेतली आहे. दिल्लीत काँग्रेसकडे वरिष्ठ वकिलांची टीम आहे. अभिषेक मनु सिंघवी हे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते स्वत: वकील आहेत. तेच याबाबतच्या कायदेशीर बाबी पाहत आहेत.

अपात्रतेच्या काही केसेसमध्ये वरच्या कोर्टाने स्थगिती दिली की नंतर दिलासाही मिळतो. राष्ट्रवादीचे खासदार मोहम्मद फझल हे याचच उदाहरण आहेत. राष्ट्रवादीच्या लक्षद्वीपच्या या खासदारालाही अपात्र ठरवलं, पोटनिवडणुकही जाहीर झाली होती. पण केरळ हायकोर्टाकडून शिक्षेला स्थगिती मिळाली आणि नंतर या सगळ्या गोष्टी बदलल्या. राहुल गांधींनी वरच्या कोर्टात धाव घेतली आहे त्यांनाही दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

# छत्तीसगडच्या दंतेवाडामध्ये १० DRG जवान आणि एक चालक शहीद

**।छत्तीसगड। महाईन्यूज।**



गेल्या काही वर्षांमध्ये छत्तीसगडच्या बस्तर जिल्ह्यातील नक्षलवाद्यांचा वावर व कारवाया कमी झाल्याचं चित्र निर्माण झालं होतं. मात्र, आज दुपारी नक्षलवाद्यांनी घडवून आणलेल्या आयईडी ब्लास्टमध्ये दहा डआरजी जवान आणि त्यांच्या वाहनाचा चालक शहीद झाले आहेत. गुप्ततर विभागाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे नक्षलवादविरोधी मोहीमेवरून हे सर्व पोलीस परत येत असताना ही घटना घडली. या हल्ल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल यांच्याशी फोनवर चर्चा केल्याची माहिती मिळत आहे.

डीआरजी अर्थात डिस्ट्रीक्ट रिझर्व्ह गार्डचे हे सर्व पोलीस होते. नक्षलवाद्यांशी सामना करण्याचं विशेष प्रशिक्षण देण्यात आलेल्या स्थानिकांचा या पथकामध्ये समावेश होता. बस्तरमधील नक्षलवादविरोधी कारवायांमध्ये डीआरजीची मोठी मदत प्रशासनाला झाली आहे.

दरम्यान, छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी या हल्ल्यानंतर ट्वीट केलं आहे. "अरणपूरमधील दंतेवाडा पोलीस ठाण्याच्या अंतर्गत नक्षलवादी असल्याची माहिती मिळाल्यानंतर डीआरजी पथक तिथे कारवाईसाठी निघाले असता नक्षलवाद्यांनी आयईडी स्फोट घडवून आणला. यामध्ये १० डीआरजी जवान आणि त्यांच्या वाहनाचा चालक असे ११ जण शहीद झाल्याचं वृत्त अत्यंत दु:खद आहे.

---

# दिल्लीतील महापौर पदाच्या निवडणुकीतून भाजपाची माघार

**।नवी दिल्ली। महाईन्यूज।**

**आपच्या डॉ.शैली ओबेरॉय यांची बिनविरोध निवड**

दिल्लीच्या महापौर पदी पुन्हा एकदा आपच्या डॉ. शैली ओबेरॉय विराजमान झाल्या आहेत. तर, उपमहापौर म्हणून आले मोहम्मद इक्बाल यांची निवड झाली आहे. मतदान प्रक्रियेच्या काही मिनिटेआधीच भाजापाने या निवडणुकीतून माघार घेतली. त्यामुळे आपचे उमेदवार यावेळी बिनविरोध निवडून आले. स्थायी समिती गठीत करण्यास आपने मनाई केली असून यामुळे लोकांचे प्रश्न प्रलंबित राहत असल्याचे कारण देत भाजपाने निवडणुकीतून माघार घेतली.

दिल्लीत २२ फेब्रुवारी रोजी महापौर पदाच्या निवडणुका झाल्या होत्या. त्यावेळी डॉ.शैली ओबेरॉय मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्या होत्या. मात्र, त्यांचा कार्यकाळ ३१ मार्च रोजीच संपुष्टात आला. दिल्ली महानगरपालिका अधिनियम १८५७ नुसार नव्या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच म्हणजेच एप्रिल महिन्यात नवा महापौर निवडला जातो. त्यानुसार, दिल्लीत पुन्हा महापौर पदाच्या निवडणुका लागल्या. या निवडणुकीत भाजपा आणि आपने दोघांनीही उमेदवार जाहीर केले. आपकडून डॉ. शैली ओबेरॉय यांना नामांकन मिळालं, तर भाजपाकडून शिखा राय यांना उमेदवारी मिळाली. तसंच, उपमहापौर पदासाठी आपकडून आले मोहम्मद इक्बाल आणि भाजपाकडून सोनी पांडेय यांनी उमेदवारी देण्यात आली होती.



# प्रचारात आघाडी घेऊनही काँग्रेसला मोदींच्या मुद्द्यांची चिंता

## पंतप्रधान मोदींच्या सभांनी भाजपचा प्रचार आक्रमक



**।नवी दिल्ली। महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**आगामी कर्नाटक विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आणि धर्मनिरपेक्ष जनता दलाने (जेडीएस) स्थानिक मुद्द्यांवर प्रचारात आघाडी घेतली आहे. भाजपची सध्या प्रचारात पिछाडी असली तरी २८ एप्रिलपासून होणाऱ्या प्रचारसभांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी कोणत्या मुद्द्याला कशी कलाटणी देतील आणि नवे मुद्दे प्रचारात आणतील याची चिंता काँग्रेसला भेडसावत आहे. शेवटच्या टप्प्यात धार्मिक ध्रुवीकरणाचे आणि राष्ट्रीय पातळीवर मुद्दे कर्नाटकमध्ये प्रचारात येतील, असे काँग्रेसला वाटत आहे.**

पंतप्रधान मोदींच्या सभांनी भाजपचा प्रचार आक्रमक होण्याची शक्यता काँग्रेसला वाटते. २८ एप्रिल ते ७ मे या कालावधीत मोदींच्या २० प्रचारसभा आणि रोड शोचे नियोजन आहे. काँग्रेस संघटनेत महत्त्वाची जबाबदारी हाताळणाऱ्या सूत्रांनी सांगितले, की कर्नाटकमध्ये आतापर्यंत काँग्रेससाठी अनुकूल वातावरण आहे. मात्र प्रचाराचा अंतिम टप्पा मतदारांचा कल ठरविण्यासाठी निर्णायक असतो. त्यादृष्टिने पंतप्रधानांच्या सभांचे परिणाम पाहावे लागतील.

लिंगायत मतपेढीवरील भाजपच्या वर्चस्वाला १९८९ नंतर पहिल्यांदाच धक्का लागला आहे. मोठ्या लिंगायत नेत्यांनी भाजपला सोडचिठ्ठी देऊन काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे ही मतपेढी शाबूत ठेवण्यासाठी मोदी हिंदुत्व आणि राष्ट्रीय पातळीवरील मुद्दे उपस्थित करून वातावरण बदलण्याचा प्रयत्न करतील.

भाजपने २०१८च्या निवडणुकीमध्ये १०४ जागा जिंकताना मतांची टक्केवारी ३६.२२ इतकी राखली होती. काँग्रेसच्या मतांची टक्केवारी त्यापेक्षा थोडी जास्त म्हणजे ३८ टक्के असली तरी मागील निवडणुकीत काँग्रेसला ८० जागाच जिंकता आल्या होत्या.

### राहुल गांधी यांच्या वीस सभा

» राहुल गांधी यांच्या २०, तर काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या ४० सभांचे नियोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्रिपदासाठी इच्छुक असलेले प्रदेशाध्यक्ष डी. के. शिवकुमार ७० मतदारसंघांमध्ये, तर माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या ६० मतदारसंघांमध्ये प्रचारसभा घेणार आहेत.

### स्थानिक नेत्यांना ताकीद

» **निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात धार्मिक ध्रुवीकरणाचे आणि राष्ट्रीय पातळीवर मुद्दे प्रचारात येण्याची शक्यता आहे. टिपू सुलतान, हिजाब, अतिक अहमद यासारखे धार्मिक ध्रुवीकरणाचे मुद्दे प्रचारात येण्याची शक्यता असल्याची चिंता काँग्रेसच्या सूत्रांना वाटते. यासारख्या मुद्द्यांवर त्याचप्रमाणे अदानी प्रकरणावर प्रदेश पातळीवरील नेत्यांनी काहीही टिप्पणी करू नये अशी ताकीदही देण्यात आल्याचे या सूत्रांनी सांगितले.**

# भाजपचे नेत्याचे आरोप फोल!

अभिनेता रितेश देशमुख आणि अभिनेत्री जेनेलिया देशमुख यांची कंपनी देश ॲग्रोची चौकशी पुर्ण झाली आहे. निबंधक कार्यालयाकडून करण्यात आलेल्या चौकशीत देखील काहीही आढळलं नाहीये. देशमुख यांच्या ॲग्रो प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत अनियमितता झाल्याची तक्रार करण्यात आली होती. दरम्यान सहकार खात्यांनतर निबंधक कार्यालयाकडून देखील दोघांना क्लीन चिट देण्यात आली आहे. त्यामुळे या दोघांना मोठा दिलासा मिळाला आहे. भाजपकडून यासंबंधी जोरदार आरोप करण्यात आले होते, मात्र चौकशीअंती अशी कुठलीही अनियमितता आढळली नाही. आम्हाला एक पहाणी अहवाल मिळाला आहे, संपूर्ण अहवाल मिळाल्यानंतर कायदेशीर सल्ला घेऊन याविषयी पुढील लढाई सुरू ठेवू अशी माहिती आमदार रमेश कराड यांनी दिली आहे.अभिनेता रितेश देशमुख आणि अभिनेत्री जेनेलिया देशमुख यांची लातूर एमआयडीसीमध्ये देश ॲग्रो प्रायव्हेट लिमिटेड कंपनी आहे. या कंपनीला महिन्याभराच्या आतच 120 कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आल्याचा आरोप स्थानिक भाजप पदाधिकाऱ्यांनी केला होता.लातूर येथील औद्योगिक वसाहतीमध्ये (एमआयडीसी) २०१९ पासून १६ उद्योजकांचे प्रस्ताव प्रलंबित असताना अभिनेते रितेश देशमुख व जेनेलिया देशमुख हे भागीदारी असलेल्या मे. देश ॲग्रो प्रा. लि. या कंपनीला अवघ्या २२ दिवसांत दोन लाख ५२ हजार ७२६ चौरस मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडाचे वाटप झाले.इतकेच नव्हे तर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने या कंपनीला तातडीने ११६ कोटी व पंढरपूर अर्बन बँकेने चार कोटी रुपये कर्ज दिले,असा अरोप करण्यात आला होता.



# सोनाक्षी सिन्हा आणि झहीर इक्बालच्या नात्याला अर्पिता खानने दिला दुजोरा

बॉलिवूड अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा झहीर इक्बालला डेट करत असल्याच्या अफवा बऱ्याच दिवसांपासून चर्चेत आहेत. जरी या जोडप्याने कधीही त्यांच्या रिलेशनशिपला कन्फर्म केले नाही. मात्र सलमान खानची बहीण अर्पिता खान शर्मा हिने अखेर सोनाक्षी सिन्हाच्या झहीर इक्बालसोबतच्या डेटिंगच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे.खरं तर, एका दिवसापूर्वी अर्पिताने एक इंस्टाग्राम स्टोरी शेअर केली ज्यामध्ये तिने सोनाक्षीला "वहिनी" म्हणून संबोधले. मात्र, अर्पिताने आता ती तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरूनही डिलीट केली आहे. विशेष म्हणजे अर्पिताने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीजवर हुमा कुरेशीच्या ईद पार्टीचे अनेक फोटो शेअर केले आहेत, ज्यामध्ये झहीर इक्बाल सोनाक्षीला जवळ धरताना दिसत आहे.गेल्या वर्षी सोनाक्षी सिन्हाने तिच्या इन्स्टाग्राम पोस्टद्वारे चाहत्यांना एका मिस्ट्री बॉयबद्दल सांगितले होते जो अभिनेत्रीच्या खूप जवळचा वाटत होता. इतकंच नाही तर सोनाक्षीच्या चेहऱ्यावरही एक सुंदर अशी स्माईल होती. तिने हिऱ्याची अंगठी घातली होती ज्यावर लिहिले होते "माझ्यासाठी मोठा दिवस!!!" माझे सर्वात मोठे स्वप्न पूर्ण होत आहे... आणि मी ते यूयूयूयू सोबत शेयर करण्यासाठी प्रतीक्षा करू शकत नाही. या पोस्टनंतर, झहीर इक्बालसोबत तिची एंगेजमेंट झाल्याची अटकळ होती. मात्र, या अफवा तिच्या नेल ब्रँडसाठी प्रमोशनल स्टंट असल्याच्या ठरल्या.गेल्या काही दिवसांपासून सोनाक्षीच्या लग्नाच्या बातम्या येत आहेत. अफवांवर प्रतिक्रिया देताना, 'दबंग' अभिनेत्रीने यापूर्वी सांगितले होते की तिला तिच्या कामाबद्दल बोलायला आवडेल. एका वृत्तवाहिनीशी बोलताना ती म्हणाली होती, "माझ्याबद्दल बोलले जात असेल तर मी माझ्या कामाबद्दल बोलेन. पण साहजिकच लोक उत्साहित आहेत." त्यांना माझ्या आयुष्यात काय चालले आहे हे जाणून घ्यायचे आहे आणि त्यांना जे हवे आहे त्याचा अंदाज लावू शकतात.





# सामंथा अभ्यासातही हुशारच!

साउथ फिल्म इंडस्ट्रीतील प्रसिद्ध अभिनेत्रींपैकी एक सामंथा रुथ प्रभू अलीकडेच तिचे दहावीचे रिपोर्ट कार्ड सोशल मीडियावर लीक झाल्यामुळे चर्चेत आली आहे. ती केवळ अभिनयातच अप्रतिम नाही तर तिचे हे रिपोर्टकार्ड पाहिल्यानंतर ती एक हुशार विद्यार्थिनी देखील आहे हे मान्य केले पाहिजे. या लीक झालेल्या रिपोर्ट कार्डचा फोटोही अभिनेत्रीने शेअर केला आहे.

सामंथाच्या या व्हायरल रिपोर्ट कार्डमध्ये तिला सर्व विषयात 80 पेक्षा जास्त गुण आहेत, तिला गणितात 100 पैकी 100 गुण मिळाले आहेत. दुसरीकडे, इतर बहुतांश विषयांत ९० च्या वर क्रमांक मिळाले आहे.लीक झालेल्या रिपोर्ट कार्डमुळे तिच्या चाहत्यांना धक्काच बसला नाही तर अभिनेत्रीचे टॅलेंट पाहून तेही आश्चर्यचकित झाले आहेत. हे रिपोर्ट कार्ड पाहिल्यानंतर चाहते त्याच्यावर जोरदार कमेंट करत आहेत, तसेच तिच्या अभिनयासोबतच ती हुशार विद्यार्थी असल्याबद्दल तिचे कौतुकही करत आहेत. तिच्या रिपोर्ट कार्डचा हा फोटो शेअर करण्यासोबतच समांथाने लिहिले आहे, 'हा हा पुन्हा एकदा समोर आला आहे.' सामंथा तिच्या चाहत्यांसाठी नेहमीच प्रेरणास्थान राहिली आहे, केवळ तिच्या अभिनयानेच नाही तर ती तिचे वैयक्तिक आयुष्य अतिशय चांगल्या प्रकारे सांभाळते. गंभीर आजाराशी झुंज देत असतानाही तिने आपल्या करिअरवर पूर्ण लक्ष केंद्रित केले.

वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाले तर, नुकताच प्रदर्शित झालेला सामंथाचा 'शाकुंतलम' चित्रपट, ज्याचे खूप कौतुक झाले आहे. यावर्षी 1 सप्टेंबरला प्रदर्शित होणाऱ्या अभिनेत्रीच्या 'कुशी' या चित्रपटाचीही चाहते वाट पाहत आहेत. ती वरुण धवनसोबत 'सिटाडेल'च्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे.



# सलग 4 पराभवानंतर विजयाचा अंकुर फुटला!

## कोलकाताचा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु विरोधात दणदणीत विजय

। हैदराबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**: आयपीएल २०२३ चा ३६ वा सामना बंगळुरुच्या चिन्नास्वामी स्टेडियममध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात रंगतदार सामना झाला. आरसीबीने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर कोलकाता नाईट रायडर्सच्या फलंदाजांनी आक्रमक खेळी करून २० षटकात ५ विकेट्स गमावत २०० धावांपर्यंत मजल मारली होती. मात्र, या धावांचा पाठलाग करणाऱ्या आरसीबीची कोलकाताच्या गोलंदाजांनी पुरती दमछाक केली.**

फाप डु प्लेसिसनंतर शाहबाझ अहमद, ग्लेन मॅक्सवेल स्वस्तात माघारी परतला आणि आरसीबीची धावसंख्या मंदावली. त्यानंतर विराट कोहलीनं अर्धशतकी खेळी करून आरसीबीच्या विजयाच्या आशा पल्लवीत केल्या होत्या. मात्र, आंद्रे रसलच्या गोलंदाजीवर व्यंकटेश अय्यरने विराटचा अप्रतिम झेल पकडला आणि आरसीबीला मोठा धक्का बसला. त्यामुळे आरसीबीने २० षटकात ८ विकेट्स गमावत १७९ धावा केल्या आणि आरसीबीचा या सामन्यात पराभव झाला.

आरसीबीचे सलामीचे फलंदाज विराट कोहली आणि फाफ डु प्लेसिसने चौफेर फटकेबाजी करत सुरुवातीच्या षटकांमध्ये धावांचा पाऊस पाडला होता. परंतु, सुयश शर्माच्या गोलंदाजीवर डु प्लेसिस १७ धावांवर असताना झेलबाद झाला आणि आरसीबीला मोठा धक्का बसला. त्यानंतर विराट कोहलीने कोलकाताच्या गोलंदाजांचा समाचार घेत अर्धशतकी खेळी केली. विराटने ३३ चेंडूत सहा चौकारांच्या मदतीनं ५१ धावांची खेळी केली. शाहबाज अहमद आणि ग्लेन मॅक्सवेल स्वस्तात माघारी परतल्याने आरसीबी दबावाच्या छायेत आली.



माहिपाल लोमरोरने १८ चेंडूत ३४ धावांची खेळी साकारली. परंतु, वरुण चक्रवर्तीच्या गोलंदाजीवर माहिपाल झेलबाद झाला आणि आरसीबीच्या विजयाची आशा मावळली. दिनेश कार्तिकही वरुण चक्रवर्तीच्या गोलंदाजीवर २२ धावांवर बाद झाला. कोलकातासाठी सुयश शर्मा आणि आंद्रे रसलने प्रत्येकी दोन विकेट घेतल्या. तर वरुण चक्रवर्तीने चार षटकांत २७ धावा देत ३ विकेट घेण्याची चमकदार कामगिरी केली.

---

# आयपीएलची हवा...पण वनडेत चार दिग्गज फलंदाजांनी आणलं वादळ

## सर्वात वेगवान अर्धशतकाचे मानकरी

। अस्ताना ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**क्रिकेटमध्ये चाहत्यांना चौकार-षटकार पाहायला खूप आवडतात. पण जे खेळाडू सर्वात वेगवान धावा बनवतात आणि सामन्याचा रुपडं पालटतात त्या खेळाडूंना अधिक पसंत केलं जातं. वर्ल्ड क्रिकेटच्या इतिहासात अशा अनेक दिग्गज खेळाडूंची नोंद झालीय. टी-२० क्रिकेट सुरु झाल्यापासून एकदिवसीय सामन्यातील स्ट्राईक रेटपर्यंत स्तर वाढला आहे. कमी स्ट्राईक रेटने धावा केलेल्या प्रेक्षकांनाही आवडत नाही. त्यामुळे चांगल्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करणाऱ्या खेळाडूंचा चाहता वर्ग दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे.**

याआधी खेळाडू आक्रमक अंदाजात फलंदाजी करत नव्हेत असं नाहीय. त्या जमान्यातही अनेक असे फलंदाज होते, ज्यांनी खूप चांगल्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करुन अनेक विक्रमांना गवसणी घातली आहे. वनडेत सर्वात वेगवान शतक ठोकणाऱ्या खेळाडूंबाबत नेहमीच ऐकलं असेल. पण आम्ही तुम्हाला चार दिग्गज फलंदाजांबाबत सांगणार आहोत. ज्यांच्या नावावर वनडे क्रिकेटमध्ये सर्वात वेगवान अर्धशतक ठोकण्याचा विक्रम नोंदवला गेला आहे.

**४) मार्टिन गप्टिल – १७ चेंडू**

न्यूझीलंडचा सलामी फलंदाज मार्टिन गप्टिल धडाकेबाज फलंदाजी करण्यासाठी ओळखला जातो. जेव्हा त्याच्या लयमध्ये असतो त्यावेळी त्याला रोखणं गोलंदाजांसाठी कठीण बनतं. गप्टिलने २०१५ मध्ये श्रीलंकाविरुद्ध झालेल्या सामन्यात १७ चेंडूत अर्धशतक ठोकण्याची कामगिरी केली.

**३) कुशल परेरा – १७ चेंडू**

श्रीलंकेचा विकेटकीपर कुशल परेराच्या नावावरही १७ चेंडूत अर्धशतक ठोकण्याचा विक्रम आहे. हा कारनामा त्याने २०१५ मध्ये पाकिस्तानविरुद्ध झालेल्या सामन्यात केला होता. पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करत २८७ धावांपर्यंत मजल मारली होती.

**२) सनथ जयसूर्या – १७ चेंडू**

श्रीलंकेचाच आणखी एक माजी दिग्गज सलामीवीर फलंदाज सनथ जयसूर्याने १७ चेंडूत ५०



धावा केल्या होत्या. त्याने ही चमकदार कामगिरी १९९६ मध्ये सिंगर कपमध्ये पाकिस्तान विरुद्ध झालेल्या सामन्यात केली होती. पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करत २१५ धावा केल्या होत्या.

**१) एबी डिविलियर्स – १६ चेंडू**

दक्षिण आफ्रिकेचा माजी दिग्गज फलंदाज एबी डिविलियर्सच्या नावावर वनडे क्रिकेटमध्ये सर्वात वेगवान अर्धशतक ठोकण्याचा विक्रम आहे. वेस्टइंडिजविरुद्ध २०१५ मध्ये त्याने फक्त १६ चेंडूत अर्धशतक ठोकण्याचा कारनामा केला होता.

---

# जागतिक बुद्धिबळ लढतीला रंगतदार वळण

अस्ताना ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

रशियाचा ग्रँडमास्टर इयान नेपोम्निर्याशीने पटावर भक्कम स्थितीत असताना केलेल्या चुकीमुळे जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ लढतीच्या १२व्या डावात चीनचा ग्रँडमास्टर डिंग लिरेनला विजय मिळवण्यात यश आले. या निकालामुळे जागतिक लढतीस पुन्हा रंगतदार वळण मिळाले असून दोन डाव शिल्लक असताना आता डिंग आणि नेपोम्नियाशी यांच्यात ६-६ अशी बरोबरी झाली आहे.लढतीत पिछाडीवर असणाऱ्या डिंगवर १२व्या डावात पांढऱ्या मोहऱ्यांनिशी खेळताना विजय मिळण्यासाठी दडपण होते. डिंगने डावाची सावध सुरुवात केली, पण नेपोम्नियाशीने १९व्या चालीत वर्चस्व मिळवले. त्याने उंटाची 'सी२' ही चाल खेळली. त्यानंतर नेपोम्नियाशीने आणखी काही चांगल्या चाली रचल्या. २५व्या चालीपर्यंत नेपोम्नियाशीने पटावरील



आपली स्थिती भक्कम केली होती. यानंतर दोन्ही खेळाडूंनी आक्रमक चाली रचण्याचा प्रयत्न केला. मात्र, मोक्याच्या क्षणी नेपोम्नियाशीने चुका केल्या आणि त्याच त्याला महागात पडल्या.

३४व्या चालीत नेपोम्नियाशीने 'एफ५'वर आपले प्यादे नेले आणि हीच त्याची सर्वात मोठी चूक ठरली. त्याने 'ई६'वर प्यादे आणण्याची लिरेनला संधी दिली आणि लिरेनने हत्ती त्या ठिकाणी आणला. यानंतर नेपोम्नियाशीने आपली हार मान्य केली. नेपोम्नियाशीने हार मान्य केली आणि जागतिक अजिंक्यपद लढतीत पुन्हा बरोबरी झाली. नेपो अप्रतिम खेळ करत होता आणि विजय त्याच्या दृष्टिक्षेपात होता. मात्र, डिंगने हिंमत दाखवली आणि आक्रमक चाली रचून धोका पत्करला.